दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. २३ मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २३७ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

शनिवार, दि. २३ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, शुक्लपक्ष, अष्टमी रात्री ४-२८ पर्यंत नंतर नवमी तिथी, दिवस नक्षत्र–मघा रात्री २-०९ पर्यंत नंतर पूर्वा, चंद्र रास - सिंह, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - मिथुन

### ब्रह्मपुरी होरपळले

**पुणे** : मान्सून वेगाने भारताकडे येत असताना देश उष्ण लाटांनी होरपळून निघत आहे. उत्तर प्रदेशातील बांदा ४८, तर विदर्भातील ब्रह्मपुरी येथे ४७.१ अंश तापमानाची नोंद झाली. मान्सूनची अरबी समुद्रात प्रगती सुरू असून, तो सध्या श्रीलंकेत मुक्कामी आहे. देशाच्या सर्वच भागांत सध्या उष्णतेची लाट प्रखर झाली असून, ती २७ मेपर्यंत राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. गुरुवारी उत्तर प्रदेशातील बांदा येथे देशातील सर्वाधिक ४८ अंश तापमानाची नोंद झाली.

## सारांश वृत्त

### पंतप्रधान मोदी यांची सुवेंदू अधिकार यांनी घेतली भेट

**नवी दिल्ली** : पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. ९ मे रोजी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर अधिकारी यांची राष्ट्रीय राजधानीत पंतप्रधानांसोबतची ही पहिली बैठक होती. पंतप्रधान कार्यालयाने 'एक्स'वर दिलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी पंतप्रधान मोदी यांची भेट घेतली.

### बेपत्ता प्रकरणात त्वरित एफआयआर नोंदवा

**नवी दिल्ली** : भारतात आतापर्यंत ४७ हजार मुलांचा शोध लागलेला नाही, असे लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी देशभरातील पोलिस अधिकाऱ्यांना बेपत्ता व्यक्तींच्या प्रकरणांमध्ये त्वरित एफआयआर दाखल करण्याचे निर्देश दिले आणि मानवी तस्करीविरोधी युनिट्स चार आठवड्यांच्या आत पूर्णपणे कार्यान्वित करावीत, असे सांगितले. न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्ला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने अनेक निर्देश जारी करून हरवलेल्या मुलांच्या वाढत्या घटनांबद्दल नाराजी व्यक्त केली.

### जामिया नगर प्रकरणी १२ जणांची मुक्तता

**नवी दिल्ली** : २००७ च्या जामिया नगर दंगलीप्रकरणी दिल्ली न्यायालयाने १२ आरोपींची मुक्तता केली. विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी १३ आरोपींवर आरोप निश्चित करण्याचे आदेश दिले. दिल्ली पोलिसांना गंभीर त्रुटी, विशेषत: ओळख परेड आयोजित करण्यात अपयशी ठरल्याबद्दल फटकारले. २२ सप्टेंबर २००७ रोजी सुमारे १,५०० जणांच्या जमावाने जामिया नगर पोलिस चौकीवर हल्ला केला होता.

### सर्वोच्च न्यायालयाचे आरक्षणाबाबत महत्त्वपूर्ण निरीक्षण

# उच्च पदस्थांच्या मुलांनाही लाभ का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणातील 'क्रीमी लेयर' निकषांबाबत सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. जर एखाद्या विद्यार्थ्याचे आई-वडील दोघेही आयएएस अधिकारी असतील, उच्च पदांवर कार्यरत असतील आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम असतील, तर त्यांच्या मुलांना आरक्षणाचा लाभ का मिळावा, असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला.



या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठासमोर झाली. ओबीसी आरक्षणातील 'क्रीमी लेयर' निकषांना आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी सुरू असताना न्यायालयाने आरक्षणाचा लाभ खरोखरच गरजूंपर्यंत पोहोचतो आहे का, याबाबत चिंता व्यक्त केली. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती नागरत्ना यांनी सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणाच्या मुद्द्यावर भाष्य केले. "जर आई आणि वडील दोघेही आयएएस अधिकारी असतील, तर त्या कुटुंबातील मुलांना उच्च दर्जाच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सुविधा मिळतात. अशा परिस्थितीत पुढील पिढीला ओबीसी आरक्षणाची आवश्यकता का असावी?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. मागासलेपणा दूर करण्यासाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम झालेल्या कुटुंबांनी आता स्वेच्छेने आरक्षणाचा लाभ सोडण्याचा विचार करायला हवा, असेही न्यायालयाने नमूद केले. "या विषयावर आता सखोल चर्चा होण्याची वेळ आली आहे," असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक अर्थात ईडब्ल्यूएस आरक्षणाचा संदर्भ देताना न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या की, ईडब्ल्यूएसमध्ये सामाजिक मागासलेपणा नसतो, तर केवळ आर्थिक दुर्बलता असते. त्यामुळे ओबीसीमधील 'क्रीमी लेयर' निकष हे ईडब्ल्यूएसपेक्षा अधिक कठोर असणे आवश्यक आहे. दोन्ही प्रवर्गांना समान निकष लावले गेले, तर त्यांच्यातील मूलभूत फरकच नाहीसा होईल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. आरक्षण व्यवस्थेत योग्य संतुलन राखणे अत्यंत आवश्यक असल्याचे खंडपीठाने नमूद केले. या प्रकरणावरील पुढील सुनावणीत केंद्र सरकार आणि संबंधित पक्षांकडून 'क्रीमी लेयर' निकषांबाबत सविस्तर मांडणी होण्याची शक्यता आहे.

# महायुतीचा प्राथमिक जागावाटप फॉर्म्युला ठरला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या निवडणुकीसाठी महायुतीमध्ये प्राथमिक जागावाटपाचा फॉर्म्युला जवळपास निश्चित झाल्याची माहिती समोर आली आहे. प्राथमिक चर्चेनुसार भाजपला सर्वाधिक जागा मिळण्याची शक्यता असून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसलाही ठरावीक जागा देण्याबाबत चर्चा सुरू आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, १७ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत भाजप ११ ते १२ जागांवर दावा करत आहे. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसला प्रत्येकी २ ते ३ जागा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांमध्ये अंतिम चर्चा झाल्यानंतरच अधिकृत घोषणा होणार असल्याचे सांगितले जात आहे. महायुतीतील समन्वय राखण्यासाठी काही मतदारसंघांमध्ये अदलाबदल होण्याचीही शक्यता आहे. काही मतदारसंघांवरून महायुतीतील पक्षांमध्ये रस्सीखेच सुरू असल्याची चर्चा आहे. नाशिक मतदारसंघावर भाजप आणि शिवसेना या दोन्ही पक्षांनी दावा केला असल्याची माहिती समोर आली आहे.

नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात मात्र भाजपचे संख्याबळ मजबूत असल्याने महायुतीला स्पष्ट आघाडी असल्याचे मानले जात आहे. भाजपसह मित्रपक्षांचे एकत्रित मताधिक्य लक्षात घेता हा मतदारसंघ महायुतीसाठी सुरक्षित मानला जात आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये वादळी पावसाचा तडाखा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : उकाड्याने हैराण झालेल्या पुणे आणि पिंपरी-चिंचवडकरांना गुरुवारी दुपारच्या पावसाने काहीसा दिलासा दिला. मात्र, या वादळी पावसासोबत आलेल्या जोरदार वाऱ्यामुळे शहरातील अनेक भागांत नुकसान झाले असून वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण झाली.

वाल्हेकरवाडी परिसरात एक मोठे झाड उभ्या वाहनांवर कोसळल्याने अनेक गाड्यांचे नुकसान झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. भोसरी आणि मोशी परिसरातही दोन ठिकाणी मोठी झाडे रस्त्यावर पडल्याने वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. युद्धपातळीवर झाडे हटवून रस्ते वाहतुकीसाठी खुले करण्यात आले.

दरम्यान, मुंबई-बेंगळुरू महामार्गावर वाकड येथील शनी मंदिराजवळ पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणावर साचल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पावसाळ्यापूर्वीची कामे सुरू असतानाच अचानक पाऊस आल्याने ही परिस्थिती निर्माण झाली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून साचलेल्या पाण्याचा निचरा करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

### केरळमध्ये २६ मे पर्यंत दाखल होणार

# मान्सूनचे शुभवर्तमान; महाराष्ट्रात वेळेवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यासह देशभरात उष्णतेची तीव्र लाट कायम असतानाच मान्सूनबाबत दिलासादायक बातमी समोर आली आहे. मे महिन्याच्या अखेरीस अनेक भागांमध्ये तापमान ४० अंशांच्या पुढे गेले असून नागरिक उकाड्याने त्रस्त झाले आहेत. अशा परिस्थितीत "मान्सून नेमका कधी येणार?" याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, यंदा मान्सून नेहमीपेक्षा लवकर दाखल होण्याची शक्यता आहे. वातावरणातील अनुकूल बदल आणि समुद्रातील स्थिती लक्षात घेता केरळमध्ये



मान्सूनचे आगमन २६ मेपर्यंत होऊ शकते, असा अंदाज हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

सामान्यतः मान्सूनचा पहिला प्रवेश १ जूनच्या आसपास केरळमध्ये होत असतो. मात्र, यंदा परिस्थिती अनुकूल असल्याने मान्सून काही दिवस आधीच दाखल होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. केरळमध्ये मान्सून लवकर पोहोचल्यास त्याचा परिणाम पुढील राज्यांतील पावसाच्या वेळापत्रकावरही होणार आहे.

केरळनंतर मान्सून कर्नाटक आणि आंध्र प्रदेशमार्गे पुढे सरकत महाराष्ट्रात दाखल होतो. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, यंदा १० जूनपर्यंत मान्सून महाराष्ट्रात पोहोचू शकतो. विशेषतः मुंबई आणि कोकण किनारपट्टीवर मान्सूनच्या सुरुवातीला जोरदार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

हवामान विभागाने दिलेल्या प्राथमिक अंदाजानुसार, १५ जूनपर्यंत मध्य प्रदेश आणि गुजरातमध्ये मान्सून सक्रिय होऊ शकतो. तर राजस्थानमध्ये २५ जून ते ५ जुलैदरम्यान मान्सून पोहोचण्याची शक्यता आहे.

दरम्यान, कृषी तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना सावधगिरीचा सल्ला दिला आहे. मान्सूनच्या संभाव्य तारखा जाहीर झाल्या असल्या तरी हवामानात अचानक बदल होण्याची शक्यता कायम असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे पहिला पाऊस पडताच घाईघाईने पेरणी न करता जमिनीत पुरेशी ओल निर्माण झाली आहे का, याची खात्री करूनच पेरणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये उष्णतेचा कहर अद्याप कायम आहे. विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये तापमान ४२ अंशांच्या पुढे गेले आहे. दुपारच्या वेळेत नागरिकांनी शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी प्यावे आणि उष्माघातापासून बचाव करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. येत्या काही दिवसांत मान्सूनच्या हालचाली अधिक स्पष्ट होणार असून हवामान विभागाकडून नियमित अद्ययावत माहिती दिली जाणार आहे.

### घराघरात जाऊन होणार पडताळणी

# राज्यात मतदार यादी पुनर्निरीक्षण मोहीम सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : महाराष्ट्रातील मतदारांसाठी महत्त्वाची असलेली विशेष सखोल पुनर्निरीक्षण मोहीम राज्यात सुरू करण्यात आली आहे. भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार तब्बल २० वर्षांनंतर राज्यभरात अशी व्यापक मोहीम राबवली जात असून मतदार यादीतील त्रुटी दूर करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. संविधानाच्या कलम ३२८ अंतर्गत ही प्रक्रिया राबवली जात आहे. राज्यातील मतदार यादी अधिक अचूक आणि अद्ययावत करण्यासाठी निवडणूक आयोगाने मोठ्या प्रमाणावर तयारी सुरू केली आहे.

या मोहिमेसाठी राज्यभरात १ लाख २५३ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची अर्थात बीएलओची नियुक्ती करण्यात आली आहे. हे अधिकारी नागरिकांच्या घरापर्यंत जाऊन प्रत्यक्ष माहितीची पडताळणी करणार आहेत. राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख ४४ हजार ४१३ मतदारांच्या तपशीलांची छाननी या मोहिमेत केली जाणार आहे. या प्रक्रियेदरम्यान दुबार नोंद झालेली नावे हटवणे, स्थलांतरित मतदारांची माहिती अद्ययावत करणे आणि मृत व्यक्तींची नावे मतदार यादीतून वगळणे अशी कामे केली जाणार आहेत.

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबवली जाईल, असे स्पष्ट केले आहे. कोणत्याही पात्र मतदाराचे नाव अन्यायकारक पद्धतीने वगळले जाणार नाही, असेही त्यांनी सांगितले. विशेषतः मुंबईसारख्या पुनर्विकास सुरू असलेल्या शहरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी स्थानिक बीएलओशी संपर्क ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शहरी भागातील नागरिकांच्या सोयीसाठी आयोगाने ऑनलाईन 'सेल्फ-मॅपिंग' सुविधाही उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे नागरिकांना घरबसल्या डिजिटल माध्यमातून माहिती अद्ययावत करता येणार आहे.

निवडणूक आयोगाने या मोहिमेचे वेळापत्रकही जाहीर केले आहे. ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत बीएलओ अधिकारी घराघरात जाऊन अर्जांचे वितरण आणि संकलन करणार आहेत. ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नागरिकांना हरकती आणि दावे नोंदवण्याची संधी दिली जाणार आहे.

### दोन पाकिस्तानी नागरिक ताब्यात

**अमृतसर** : पंजाबमधील अमृतसर येथे भारत-पाकिस्तान सीमेवर सीमा सुरक्षा दलाने बेकायदेशीरपणे भारतीय हद्दीत प्रवेश करणाऱ्या दोन पाकिस्तानी नागरिकांना ताब्यात घेतले आहे. या दोघांकडून एक चारचाकी वाहनही जप्त करण्यात आले असून सुरक्षा यंत्रणांकडून त्यांची सखोल चौकशी सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेले दोघेही पाकिस्तानातील कसूर परिसरात विविध दुकानांमध्ये वस्तू पुरवण्याचे काम करत होते. बीएसएफ जवानांनी संशयास्पद हालचाली लक्षात येताच तात्काळ कारवाई करत दोघांना ताब्यात घेतले. वाहनाचीही तपासणी करण्यात आली.

# अभियांत्रिकी प्रवेशांवर परिणाम नाही

### नियोजित वेळापत्रकानुसार प्रक्रिया

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : नीट यूजी २०२६ परीक्षा पेपरफुटीप्रकरणी रद्द करण्यात आल्यानंतर राज्यातील अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेवर परिणाम होणार असल्याच्या चर्चांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने पूर्णविराम दिला आहे. अभियांत्रिकी आणि औषधनिर्माण अभ्यासक्रमांचे प्रवेश नियोजित वेळापत्रकानुसारच होणार असून विद्यार्थी आणि पालकांनी संभ्रम बाळगू नये, असे आवाहन सीईटी कक्षाने केले आहे.

नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून ३ मे रोजी घेण्यात आलेली नीट यूजी परीक्षा पेपरफुटीमुळे रद्द करण्यात आली होती. आता ही परीक्षा २१ जून रोजी पुन्हा घेतली जाणार आहे. त्यानंतर राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला विलंब होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती.

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी नीट परीक्षा पुढे ढकलल्याचा परिणाम काही अभ्यासक्रमांच्या प्रवेशांवर होऊ शकतो, असे वक्तव्य केल्यानंतर विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता.

त्यानंतर राज्य सामाईक परीक्षा कक्षाने अधिकृत स्पष्टीकरण जारी केले आहे. सीईटी कक्षाच्या माहितीनुसार, महाराष्ट्रात नीट यूजीचे गुण केवळ ९ विशिष्ट अभ्यासक्रमांसाठी ग्राह्य धरले जातात. हे अभ्यासक्रम राज्यातील १७ शासनमान्य संस्थांमध्ये उपलब्ध आहेत.

अभियांत्रिकी प्रवेशासाठी मुख्यत्वे एमएचटी-सीईटीच्या गुणांचा आधार घेतला जातो. सुमारे ८५ टक्के जागांवरील प्रवेश एमएचटी-सीईटीच्या आधारे होतात, तर १५ टक्के जागांसाठी नीट यूजी गुणांचा वापर केला जातो. त्यामुळे नीट पुनर्परीक्षेमुळे संपूर्ण अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया लांबणीवर जाणार नसल्याचे सीईटी कक्षाने स्पष्ट केले आहे.

### सीमावर्ती गावांमध्ये दिलास्याचे वातावरण

# भारत-बांगलादेश सीमेवर कुंपणाच्या कामाला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगालमध्ये भारत-बांगलादेश सीमेलगत सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यासाठी कुंपण उभारण्याच्या कामाला वेग आला आहे. सिलिगुडी उपविभागातील फांसीदेवा परिसरात सीमा सुरक्षा दलाकडून कुंपणाचे काम सुरू करण्यात आले असून सीमाभागातील नागरिकांनी याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

राज्य सरकारने सीमा सुरक्षा दलाला सुमारे २७ किलोमीटर परिसरातील जमीन उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतल्यानंतर प्रत्यक्ष



कामाला सुरुवात झाली आहे. सीमाभागात घुसखोरी रोखण्यासाठी आणि सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी हा महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे. सीमावर्ती भागातून समोर आलेल्या छायाचित्रांमध्ये कुंपण उभारणीचे काम वेगाने सुरू असल्याचे दिसत आहे. यापूर्वी जमीन हस्तांतरणाच्या प्रक्रियेमुळे हे काम प्रलंबित होते. मात्र आता प्रशासनाने प्रत्यक्ष अंमलबजावणीला सुरुवात केली आहे.

स्थानिक नागरिकांनीही या निर्णयाचे स्वागत केले आहे. एका रहिवाशाने सांगितले की, "यापूर्वी सीमाभागात असुरक्षिततेचे वातावरण होते. आता सुरक्षा वाढत असल्याने दिलासा मिळत आहे." दुसऱ्या एका नागरिकाने सांगितले की, सीमावर्ती भागात पूर्वी भीतीचे वातावरण होते आणि आता परिस्थितीत बदल होत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

स्थानिक रहिवासी नारायण साहा यांनी सांगितले की, गावकऱ्यांकडून अनेक वर्षांपासून सीमेला कुंपण घालण्याची मागणी केली जात होती. "आता सुरक्षा यंत्रणांना काम करण्यासाठी मोकळीक मिळाल्याने नागरिकांना सुटकेचा नि:श्वास मिळाला आहे," असे त्यांनी म्हटले.

शिवम मोडक या आणखी एका स्थानिक नागरिकाने या कामाला राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित महत्त्वाचे पाऊल असे संबोधले. "पूर्वी सीमाभागात असुरक्षिततेची भावना होती. आता कुंपण उभारणीमुळे परिस्थिती सुधारेल, अशी अपेक्षा आहे," असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी यापूर्वीच्या सरकारवर सीमा सुरक्षेसाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्यात विलंब केल्याचा आरोप केला आहे. पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत जमीन हस्तांतरणाचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. राज्य सरकारकडून ही जमीन केंद्रीय गृह मंत्रालयाकडे हस्तांतरित केल्यानंतर सीमा सुरक्षा दलाकडून कुंपणाचे काम पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

# पेपरफुटीचे महाराष्ट्र हेच केंद्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : नीट पेपरफुटी प्रकरणाच्या तपासात केंद्रीय अन्वेषण विभागाने आणखी एक मोठी कारवाई करत पुण्यातील मनीषा हवालदार हिला अटक केली आहे. फिजिक्स विषयाची प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवल्याचा आरोप तिच्यावर ठेवण्यात आला आहे. या प्रकरणात सीबीआयने केलेली ही आतापर्यंतची अकरावी अटक आहे.


तपासादरम्यान मनीषा हवालदार हिने परीक्षेपूर्वी काही विद्यार्थ्यांना फिजिक्सची प्रश्नपत्रिका उपलब्ध करून दिल्याचे समोर आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या संपूर्ण घोटाळ्याचे महत्त्वाचे धागेदोरे महाराष्ट्राशी जोडले गेले असल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे.

आतापर्यंत अटक करण्यात आलेल्या ११ आरोपींपैकी सात आरोपी महाराष्ट्रातील असल्याचे तपासातून स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात पुण्यातील बालरोग तज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांचीही चौकशी सुरू असून त्यांना अद्याप अटक करण्यात आलेली नाही. मात्र, तपासाचा फास आणखी आवळला जात असल्याचे संकेत मिळत आहेत.

सीबीआयने महाराष्ट्रातून अटक केलेल्या आरोपींमध्ये शिवराज मोटेगावकर, प्रल्हाद कुलकर्णी, मनिषा मांढरे, मनिषा वाघमारे, मनीषा हवालदार, शुभम खैरनार आणि धनंजय लोखंडे यांचा समावेश आहे. याशिवाय इतर राज्यांमधून दिनेश बिवाल, मांगीलाल बिवाल, विकास बिवाल आणि यश यादव यांना अटक करण्यात आली आहे.

## संपादकीय

# गंगेचे मरण आणि उशिराचे शहाणपण



**उत्तराखंडमधील गंगा नदीच्या उगमाकडील क्षेत्रात नवीन धरण प्रकल्प उभारण्यास केंद्र सरकारने दिलेली स्पष्ट नकारघंटा हे हिमालयाच्या नाजूक पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी उचललेले स्वागतार्ह पाऊल आहे. ऊर्जा सुरक्षेच्या नावाखाली निसर्गाचा अनियंत्रित बळी देण्याच्या आत्मघातकी धोरणाला यामुळे आता काहीसा लगाम बसेल अशी अपेक्षा आहे.**

निसर्गाचा समतोल बिघडवून मानवाने स्वतःच्या विकासाची जी व्याख्या तयार केली आहे, तिचे भयानक परिणाम आपल्याला सातत्याने अनुभवायला मिळत आहेत. उत्तराखंडमधील जोशीमठ आणि केदारनाथ खोऱ्यात अलिकडच्या वर्षांत झालेल्या नैसर्गिक आपत्ती या केवळ नैसर्गिक दुर्घटना नव्हत्या, तर ते मानवी हव्यासाला निसर्गाने दिलेले गंभीर इशारे होते. या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात गंगा नदीच्या वरच्या खोऱ्यात, विशेषतः अलकनंदा आणि भागीरथी नद्यांच्या उगमाकडील संवेदनशील भागात, नवीन जलविद्युत प्रकल्प किंवा धरणे उभारण्यास परवानगी न देण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत दिलासादायक आणि अभूतपूर्व असाच म्हणावा लागेल. गंगेला केवळ धार्मिक किंवा भावनिक दृष्टिकोनातून न पाहता, तिच्या अस्तित्वाचे पर्यावरणीय महत्त्व स्वीकारण्याच्या दिशेने केंद्र सरकारने टाकलेले हे एक शहाणपणाचे पाऊल आहे. ऊर्जा निर्मितीची भूक आणि हिमालयाची पर्यावरणीय संवेदनशीलता या दोन्हीमध्ये संतुलन साधताना अखेर निसर्गाच्या रक्षणाला प्राधान्य देणे सरकारला भाग पडले आहे, हे या निर्णयावरून स्पष्ट होते. हिमालयाची पर्वतरांग ही जगातील सर्वांत तरुण आणि भूगर्भीय दृष्ट्या अत्यंत अस्थिर रचना मानली जाते. हा भाग 'झोन ५' म्हणजेच तीव्र भूकंपाच्या क्षेत्रात मोडतो. अशा नाजूक भौगोलिक रचनेमध्ये महाकाय धरणे बांधणे, बोगदे तयार करण्यासाठी सुरुंगांचे स्फोट घडवून आणणे आणि नद्यांचे प्रवाह अडवणे म्हणजे पर्यावरणाच्या विनाशाला स्वतःहून आमंत्रण देण्यासारखे आहे. नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल आणि विविध तज्ज्ञ समित्यांनी यापूर्वी अनेकदा या धोक्यांकडे लक्ष वेधले होते. मात्र, विकासदराचा वेग राखण्याच्या नादात आणि वीज निर्मितीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी या इशाऱ्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केले गेले. केंद्राच्या ताज्या भूमिकेमुळे आता या अनियंत्रित बांधकामांना अधिकृतपणे लगाम बसेल. या संपूर्ण वादाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे गंगेचे 'अविरल' आणि 'निर्मल' असणे. गंगा नदीच्या पाण्याचे शुद्धीकरण करण्याचे निसर्गदत्त सामर्थ्य तिच्या वेगवान आणि अखंड प्रवाहामध्ये दडलेले आहे. जेव्हा नदीचा प्रवाह धरणांच्या भिंतींमागे अडवला जातो, तेव्हा तिची स्वतःला स्वच्छ करण्याची क्षमता संपुष्टात येते. केंद्राच्या 'नमामी गंगे' मोहिमेवर हजारो कोटी रुपये खर्च करूनही जोपर्यंत नदीचा प्रवाह नैसर्गिक राहत नाही, तोपर्यंत गंगेचे शुद्धीकरण अशक्य आहे. सर्वोच्च न्यायालयातील ताज्या प्रतिज्ञापत्रात सरकारने या वास्तवाचा स्वीकार केला आहे. विकास हा शाश्वत असावा, तो निसर्गाचा गळा घोटून साधता येत नाही, हाच धडा या निमित्ताने समोर आला आहे. अर्थात, या निर्णयामुळे उत्तराखंड आणि केंद्र सरकारसमोरील ऊर्जा व्यवस्थापनाची आव्हाने वाढणार आहेत, यात शंका नाही. जलविद्युत हा ऊर्जेचा एक महत्त्वाचा आणि तुलनेने स्वच्छ स्त्रोत मानला जातो. मात्र, एका बाजूला प्रदूषणमुक्त ऊर्जेचा पर्याय शोधताना दुसऱ्या बाजूला हिमालयासारख्या महाकाय परिसंस्थेचा बळी देणे परवडणारे नाही. उत्तराखंडसारख्या डोंगराळ राज्यांच्या आर्थिक विकासासाठी केवळ धरणांवर अवलंबून न राहता, तिथल्या पर्यावरणपूरक पर्यटनाला आणि स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देणारी नवीन आर्थिक मॉडेल्स विकसित करावी लागतील. न्यायालयात दिलेले प्रतिज्ञापत्र आणि जमिनीवरील प्रत्यक्ष परिस्थिती यात अनेकदा तफावत आढळते. बेकायदेशीर वाळू उपसा, डोंगर पोखरून केले जाणारे रस्त्यांचे रुंदीकरण आणि नियमांचे उल्लंघन करून चालणारी हॉटेल्स व रिसॉर्ट्सचे बांधकाम आजही हिमालयाच्या कुशीत सर्रास सुरू आहे. त्यामुळे केवळ नवीन धरणांना बंदी घालून चालणार नाही, तर आधीच अस्तित्वात असलेल्या प्रकल्पांचे कडक पर्यावरणीय ऑडिट होणे गरजेचे आहे. कोणत्याही नवीन पायाभूत सुविधा प्रकल्पाला मंजुरी देण्यापूर्वी त्याची 'वहन क्षमता' तपासणे बंधनकारक केले पाहिजे. केंद्र सरकारने घेतलेला हा निर्णय म्हणजे एका प्रदीर्घ लढाईची सुरुवात आहे. गंगेचे मरण रोखण्यासाठी आलेले हे शहाणपण राजकीय दबावापोटी किंवा तात्कालिक फायद्यासाठी मागे घेतले गेले, तर येणारा काळ आपल्याला कधीही माफ करणार नाही. निसर्गाशी जुळवून घेत केलेला विकासच मानवाला दीर्घायुष्य देऊ शकतो, हाच अंतिम संदेश आहे.

# उत्तरेकडील प्रगतीची नवी नॉर्डिक समीकरणे

**» नॉर्डिक देशांशी सहकार्य वाढवण्याच्या भारताच्या धोरणात्मक प्रयत्नांमुळे देशात प्रगत तंत्रज्ञान आणि हरित भांडवलाचा ओघ वाढून शाश्वत विकासाला मोठी गती मिळण्याची चिन्हे आहेत.**



जागतिक भू-राजकीय आणि आर्थिक समीकरणे वेगाने बदलत असताना, भारताने आपले परराष्ट्र आणि आर्थिक धोरण अधिक व्यापक व बहुआयामी करण्यास सुरुवात केली आहे. पारंपरिक मित्रदेश आणि मोठ्या जागतिक सत्तांसोबतचे संबंध दृढ करतानाच, भारताने आता युरोपच्या उत्तर भागात असलेल्या 'नॉर्डिक' देशांकडे (डेन्मार्क, फिनलंड, आइसलँड, नॉर्वे आणि स्वीडन) आपले लक्ष केंद्रित केले आहे.

नुकतीच नवी दिल्लीत पार पडलेली भारत-नॉर्डिक परिषद ही याच धोरणात्मक दूरदृष्टीचा एक भाग आहे. या देशांची एकूण लोकसंख्या आणि भौगोलिक आकारमान भारताच्या तुलनेत अत्यंत मर्यादित असले, तरी जागतिक अर्थव्यवस्थेतील त्यांचे स्थान, नवसंशोधन, हरित तंत्रज्ञान आणि अफाट आर्थिक क्षमता यामुळे हा प्रादेशिक गट भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. भारतासारख्या महाकाय आणि वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेला पुढील टप्प्यावर घेऊन जाण्यासाठी या 'उत्तरेकडील देशांची' साथ तंत्रज्ञान आणि भांडवलाच्या रूपाने मैलाचा दगड ठरू शकते.

नॉर्डिक देशांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे शाश्वत विकास आणि हरित ऊर्जा या क्षेत्रांतील त्यांचे जागतिक नेतृत्व होय. हवामान बदलाच्या आव्हानांचा सामना करत असतानाच आर्थिक प्रगती कशी साध्य करावी, याचे आदर्श मॉडेल या देशांनी जगासमोर ठेवले आहे. नॉर्वेचा 'गव्हर्नमेंट पेन्शन फंड ग्लोबल' हा जगातील सर्वांत मोठ्या सार्वभौम संपत्ती फंडांपैकी एक आहे. शाश्वत आणि पर्यावरणपूरक प्रकल्पांमध्ये दीर्घकालीन गुंतवणूक करण्यासाठी हा फंड ओळखला जातो. भारताला आपल्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी, तसेच स्मार्ट शहरे, डिजिटल नेटवर्क आणि स्वच्छ वाहतूक व्यवस्था उभारण्यासाठी अब्जावधी डॉलर्सच्या गुंतवणुकीची गरज आहे. नॉर्डिक देशांमधील हे पेन्शन फंड आणि खासगी गुंतवणूकदार भारतासारख्या स्थिर, लोकशाही आणि वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठेकडे आकर्षित होत आहेत. या भांडवलाचा ओघ भारतात सुरू झाल्यास, देशातील पायाभूत सुविधांच्या विकासाला गती तर मिळेलच, पण सोबतच जागतिक गुंतवणूकदारांमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेबद्दलचा विश्वास आणखी दृढ होईल.

नवसंशोधन आणि डिजिटल परिवर्तनाच्या बाबतीत स्वीडन आणि फिनलंड या देशांनी जगात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. फिनलंडची शिक्षण व्यवस्था आणि दूरसंचार क्षेत्रातील तंत्रज्ञान जगप्रसिद्ध आहे, तर स्वीडन हे जागतिक पातळीवरील अग्रगण्य इनोव्हेशन हब मानले जाते. भारत आज जगातील सर्वांत मोठी 'स्टार्ट-अप' परिसंस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. आपल्याकडील तरुण मनुष्यबळ आणि नॉर्डिक देशांमधील अत्याधुनिक तंत्रज्ञान व व्यवस्थापकीय कौशल्य यांचा मिलाफ झाल्यास, तंत्रज्ञान क्षेत्रात एक नवी क्रांती घडून येऊ शकते. ५जी, ६जी तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सायबर सुरक्षा यांसारख्या भविष्यकालीन क्षेत्रांमध्ये या देशांसोबतची भागीदारी भारताला जागतिक स्तरावर आघाडी मिळवून देऊ शकते.

ही भागीदारी केवळ एकतर्फी नाही; नॉर्डिक देशांनाही भारताची तितकीच गरज आहे. हे देश सध्या घटती लोकसंख्या आणि कुशल मनुष्यबळाची टंचाई या गंभीर समस्येचा सामना करत आहेत. भारताकडे जगातील सर्वांत तरुण आणि तंत्रज्ञानस्नेही कार्यबळ उपलब्ध आहे. त्यामुळे कुशल भारतीय अभियंते, आयटी व्यावसायिक आणि शास्त्रज्ञ यांच्यासाठी नॉर्डिक देशांमध्ये रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होऊ शकतात. याशिवाय, युरोपमधील कडक पर्यावरणीय नियमांमुळे तिथल्या कंपन्यांना आपल्या उत्पादनांचा विस्तार करण्यासाठी भारतासारख्या विशाल बाजारपेठेची आणि अनुकूल धोरणांची आवश्यकता आहे. भारताने सुरू केलेली 'मेक इन इंडिया' आणि 'उत्पादन संलग्न प्रोत्साहन' योजना नॉर्डिक कंपन्यांसाठी एक उत्तम व्यासपीठ ठरू शकते, जिथे ते उत्पादन करून जागतिक बाजारपेठेत निर्यात करू शकतात. या सहकार्याला अधिकृत आणि कायदेशीर चौकट देण्यासाठी भारत आणि 'युरोपियन फ्री ट्रेड असोसिएशन' मधील व्यापार करार महत्त्वपूर्ण ठरेल, ज्यामध्ये नॉर्डिक देशांची भूमिका कळीची आहे. भारताचा हा 'नॉर्डिक आऊटरीच' म्हणजे आर्थिक समृद्धी आणि शाश्वत भविष्यासाठी आखलेली एक ठोस रणनीती आहे. उत्तरेकडील या देशांकडून येणारे तंत्रज्ञान आणि भांडवल भारताच्या औद्योगिक व पर्यावरणीय परिवर्तनाला पूरक ठरणारे आहे. ही भागीदारी जशी जशी घट्ट होईल, तशी तशी भारताची जागतिक मंचावरील पत अधिक वाढेल आणि 'आत्मनिर्भर भारत' घडवण्याच्या स्वप्नाला तंत्रज्ञानाची आधुनिक जोड मिळेल.

# शहराच्या सुधारित डीपीला सहा महिन्यांची मुदतवाढ

## ५० हजार हरकतींमुळे प्रक्रिया रखडली

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या वादग्रस्त ठरलेल्या प्रारूप सुधारित विकास योजना आराखड्याच्या (डीपी) सुनावणी प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही.

हरकती आणि सूचनांवरील सुनावणी पूर्ण करून प्रारूप सुधारित डीपी राज्य शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यासाठी आणखी सहा महिन्यांचा कालावधी लागू शकतो. त्यामुळे डीपी सादर करण्यासाठी राज्य शासनाकडे मुदतवाढ मागण्यात आली आहे.

महापालिकेने १५ मे २०२५ रोजी शासन राजपत्रात प्रारूप सुधारित डीपी प्रसिद्ध केला होता. पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून वर्ग करण्यात आलेल्या क्षेत्रासह एकूण १७३.२४ चौरस किलोमीटर परिसराचा या आराखड्यात समावेश करण्यात आला आहे.

सन २०३१ पर्यंत ४२ लाख ४० हजार आणि सन २०४१ पर्यंत ६१ लाख लोकसंख्या गृहित धरून शहराच्या भविष्यातील विकासाचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

मात्र, डीपीमधील प्रस्तावित आरक्षणांवरून शहरात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. नागरिक, जागामालक, शेतकरी आणि भूमिपुत्रांनी अनेक आरक्षणे अनावश्यक असल्याचा आरोप करत आंदोलनही केले होते. या डीपीवर १४ जुलै २०२५ पर्यंत हरकती आणि सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्या मुदतीत तब्बल ५० हजार हरकती आणि सूचना प्राप्त झाल्या आहेत.

या हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी नियोजन समिती स्थापन करणे आवश्यक होते. शासनाने या समितीसाठी प्रकाश भुक्ते, दत्तात्रय पवार, उत्तरेश्वर लोंढे आणि नरसु शिंदे यांची तज्ज्ञ सदस्य म्हणून निवड केली आहे. समितीत स्थायी समितीच्या तीन सदस्यांचाही समावेश आवश्यक आहे. मात्र, सत्ताधारी भाजपकडून त्या नावांवर एकमत होत नसल्याने हा विषय वारंवार तहकूब होत असल्याची माहिती समोर आली आहे. यावरून विरोधकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

राज्य शासनाच्या नियमानुसार १५ जून २०२६ पर्यंत डीपी मंजुरीसाठी पाठविणे अपेक्षित होते. मात्र, समिती स्थापन न झाल्याने सुनावणी प्रक्रिया सुरूच होऊ शकली नाही. त्यामुळे नगररचना विभागाने आणखी सहा महिन्यांची मुदतवाढ मागितली असून, त्या प्रस्तावाला महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली आहे. ही मुदत आता १५ डिसेंबर २०२६ पर्यंत असणार आहे. या कालावधीत सुनावणी पूर्ण करून डीपी राज्य शासनाकडे पाठविणे बंधनकारक असणार आहे.

दरम्यान, महापालिका निवडणुकीदरम्यान भाजपने डीपी रद्द करण्याचे आश्वासन दिले होते. विधीमंडळ अधिवेशनात भाजप आमदारांनी डीपीविरोधात भूमिका घेतली होती. मात्र, आता मुदतवाढ मागविण्यात आल्याने भाजपने भूमिकेत बदल केल्याची टीका विरोधकांकडून होत आहे.

# राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त पिंपरी-चिंचवड पालिकेत अभिवादन

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** माजी पंतप्रधान आणि भारतरत्न राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मुख्य प्रशासकीय इमारतीत त्यांच्या प्रतिमेस महापौर रवी लांडगे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, सहशहर अभियंता बापुसाहेब गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त देशभरात "दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन" पाळला जातो. त्यानिमित्त उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दहशतवाद व हिंसाचाराचा सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याची तसेच देशातील सामाजिक एकता, शांतता आणि सामंजस्य जपण्याची शपथ घेतली. "मानवी जीवनमूल्यांना धोका निर्माण करणाऱ्या विघटनकारी शक्तींना विरोध करू," असा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. या प्रसंगी जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी शपथेचे वाचन केले. देशाच्या अखंडतेसाठी आणि अहिंसा-सहिष्णुतेच्या मूल्यांसाठी एकत्र राहण्याचा संकल्प व्यक्त केला.

# 'एलपीजी विरहित शहर' बनविण्याचे लक्ष्य

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराला पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि आधुनिक इंधन व्यवस्थेकडे नेण्यासाठी महानगरपालिकेने 'एलपीजी विरहित शहर' ही महत्त्वाकांक्षी संकल्पना पुढे आणली आहे. यासाठी नागरिक, गृहनिर्माण संस्था आणि महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड यांनी संयुक्तपणे पुढाकार घ्यावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले.

घरगुती पाईप गॅसचा वापर वाढविणे, एलपीजी सिलिंडरवरील अवलंबित्व कमी करणे आणि पर्यावरणपूरक इंधनाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृहात महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत महापालिका अधिकारी, महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडचे प्रतिनिधी, सहकार विभागाचे अधिकारी तसेच विविध गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत बोलताना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केंद्र सरकारच्या इंधन बचत आणि पर्यावरणपूरक ऊर्जावापराबाबतच्या धोरणाचा संदर्भ देत शहरात पाईप गॅस प्रणालीचा वापर वाढविणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. देशातील अनेक शहरांमध्ये घरगुती पाईप गॅस यशस्वीपणे वापरला जात असून, त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवडमधील प्रत्येक गृहनिर्माण सोसायटीमध्ये ही सुविधा प्रभावीपणे पोहोचविण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, उप आयुक्त अण्णा बोदडे, एमएनजीएलचे व्यवस्थापकीय संचालक शंकर कुमार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी आणि गृहनिर्माण संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

आयुक्तांनी नागरिकांमध्ये पाईप गॅसबाबत विश्वास निर्माण करण्यासाठी सोशल मीडिया मोहिमा, माहितीपत्रकांचे वितरण, प्रशिक्षण शिबिरे, प्रत्यक्ष सोसायटी भेटी आणि घराघरांत जनजागृती मोहीम राबविण्याच्या सूचना दिल्या. ज्या गृहनिर्माण संस्थांमध्ये एमएनजीएलचे कनेक्शन उपलब्ध असूनही वापर कमी आहे, अशा सोसायट्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे निर्देशही देण्यात आले. तसेच, एमएनजीएलने समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती करून नागरिकांच्या तांत्रिक अडचणी, कनेक्शन प्रक्रिया आणि शंकांचे त्वरित निरसन करावे, असेही सांगण्यात आले. गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी अधिकाधिक नागरिकांना या योजनेत सहभागी करून घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले.

बैठकीत पाईप गॅस प्रणालीचे फायदे अधोरेखित करण्यात आले. या प्रणालीमुळे सिलिंडर साठवणुकीची गरज राहत नाही, गॅस पुरवठा अखंडित राहतो, वेळेची बचत होते आणि पर्यावरणीयदृष्ट्या हा पर्याय अधिक सुरक्षित व प्रभावी ठरतो, असे मत व्यक्त करण्यात आले.

# एज फर्निचर मॉल गोळीबार प्रकरणी ३ आरोपी जेरबंद

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**






**पिंपरी :** पिंपरी-चिंचवडमधील रावेत परिसरात घडलेल्या एजे फर्निचर मॉल गोळीबार प्रकरणात पोलिसांना मोठे यश मिळाले असून कुख्यात आरजू बिश्नोई आणि कुलदीप कशिश गँगशी संबंधित तीन आरोपींना उत्तराखंडमधून अटक करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या गुंडाविरोधी पथकाने ही कारवाई केली असून या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

१५ मे रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास रावेत येथील एजे फर्निचर मॉलवर दोन अज्ञात आरोपींनी तब्बल आठ राउंड गोळीबार केला होता. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. गोळीबार करून आरोपी महाराष्ट्राबाहेर फरार झाले होते.

घटनेचा तपास करताना पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा माग काढला. इंदोर, चंदीगड आणि हरिद्वारपर्यंत पाठलाग केल्यानंतर अखेर उत्तराखंडमध्ये आरोपींना अटक करण्यात यश आले. प्रवीण रामनिवास पंकज, कुलदीप राठी आणि सागर अजय पाल अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

प्राथमिक तपासात फर्निचर मॉलच्या मालकांकडे दोन कोटी रुपयांची खंडणी मागण्यात आल्याचे समोर आले आहे. खंडणी देण्यास नकार दिल्यानंतर दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने गोळीबार करण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. आरोपींकडून या कटासंदर्भात महत्त्वाची माहिती मिळाल्याचे सांगितले जात असून या प्रकरणातील इतर संबंधितांचाही शोध सुरू आहे.

घटनेपूर्वी आरोपींकडून सोशल मीडियावर धमकीची पोस्ट टाकण्यात आल्याची माहिती तपासात समोर आली आहे. या पोस्टद्वारे गंभीर इशारा देण्यात आला होता. पोलिसांनी या बाबीची गंभीर दखल घेत तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींपर्यंत पोहोचण्यात यश मिळवले. प्राथमिक तपासामध्ये असे निष्पन्न झाले आहे की, अटक आरोपींनी सदरचा गुन्हा बिष्णोई गँगचे सदस्य आरजु बिष्णोई, शुभम लोणकर आणि कुलदीप ऊर्फ कशीष यांचे सांगण्यावरुन केलेला आहे. कुलदीप ऊर्फ कशीष हा सिध्दु मुसेवाला यांचे खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी आहे. बिष्णाई टोळी विरुध्द खुन, खंडणी, अवैध शस्त्र बाळगणे, इत्यादी गुन्हे दाखल आहेत. आरजु बिष्णोई याने आरोपींना दोन पिस्टल, काडतुस, पैसे, वाहने इत्यादी हस्तकांमार्फत पुरविलेले आहेत.

ही कारवाई पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्तशशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त गुन्हे सारंग आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप सावंत, पोलीस निरीक्षक नितीन फटांगरे, रावेत पोलीस ठाणे, पोलीस निरीक्षक विकास राउत, सहायक पोलीस निरीक्षक हरीष माने, पोउपनि समीर लोंढे, पोउ-नि मयुरेश साळुंखे व गुंडा विरोधी पथक रावेत पोलीस ठाणे, यांनी केला. पिंपरी-चिंचवड पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

# वाहन विक्रीत महाराष्ट्र देशात ठरला अव्वल

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये वाहन विक्रीच्या बाबतीत महाराष्ट्राने देशात आघाडी घेतली असून कार आणि अवजड व्यावसायिक वाहनांच्या विक्रीत राज्याने प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर दुचाकी आणि तीनचाकी वाहनांच्या विक्रीतही महाराष्ट्राने पहिल्या तीन राज्यांमध्ये स्थान मिळवले आहे. ही माहिती सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स (एसआयएएम) यांनी जाहीर केलेल्या आकडेवारीतून समोर आली आहे.

आकडेवारीनुसार एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत देशभरात ४६.४३ लाख कारची विक्री झाली. त्यापैकी महाराष्ट्रात तब्बल ५.६१ लाख कार विकल्या गेल्या असून, देशातील एकूण कार विक्रीमध्ये राज्याचा १२.१ टक्के वाटा राहिला आहे. उत्तर प्रदेश ४.९२ लाख कार विक्रीसह दुसऱ्या क्रमांकावर असून त्यांचा वाटा १०.६ टक्के आहे. गुजरातने ३.७१ लाख कार विक्रीसह ८ टक्के वाटा मिळवला आहे. दुचाकी विक्रीत उत्तर प्रदेश अव्वल असला तरी महाराष्ट्राने २४.५३ लाख दुचाकींची विक्री करत देशातील एकूण विक्रीमध्ये ११.३ टक्के वाटा मिळवला आहे. देशभरात एकूण २ कोटी १७ लाख १० हजार दुचाकी विकल्या गेल्या. उत्तर प्रदेशात ३१.९१ लाख दुचाकी विकल्या गेल्या असून त्यांचा वाटा १४.७ टक्के आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### तरुणावर जीवघेणा हल्ला; चौघांना अटक

**लोणी काळभोर :** दमवाकवस्ती (ता. हवेली) येथील सागर रेस्टॉरंट अँड बारमध्ये एका तरुणाला "तू आमच्याकडे का पाहतोस? आम्ही येथील भाई आहोत... तुझा मर्डर करून टाकतो," अशी धमकी देत बिअरच्या बाटल्या डोक्यात फोडून खुनाचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना शनिवारी (दि. १६) रात्री साडेदहाच्या सुमारास घडली होती. या प्रकरणाचा तपास करत लोणी काळभोर पोलिसांनी एका विधीसंघर्ष बालकासह चार आरोपींना अटक केली आहे. राज राजेंद्र पवार, सौरभ सुनील गायकवाड आणि राहुल संतोष घाडगे (सर्व रा. कवडीपाट टोलनाका, कदमवाकवस्ती, ता. हवेली, जि. पुणे) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. तसेच एका १७ वर्षीय विधीसंघर्ष बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. अटक आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. तर विधीसंघर्ष बालकाला बाल न्यायालयासमोर हजर केले असता त्याला १४ दिवसांसाठी बालसुधारगृहात पाठविण्याचे आदेश देण्यात आले.

### भाटघर, निरा-देवघर धरणांनी गाठला तळ

**पुणे :** मे महिना संपत आला तरीही कडक उन्हाळा, वाढते तापमान आणि प्रचंड उकाड्यामुळे भोर तालुक्यात पाणीटंचाईचे संकट तीव्र होत आहे. उन्हाळी आवर्तनासाठी भाटघर आणि निरा-देवघर धरणांतून पाणी सोडण्यात आल्याने दोन्ही धरणांतील पाणीसाठा मोठ्या प्रमाणात घटला असून धरणांनी अक्षरशः तळ गाठला आहे. सध्या भाटघर धरणात केवळ १०.५३ टक्के, तर निरा-देवघर धरणात २४.१२ टक्के इतकाच पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. त्यामुळे आगामी काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. धरणांतील पाणीपातळी घटल्याने भोर शहरासह ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. यामुळे चिंतेचे वातावरण आहे. शेतकरी वर्गही अडचणीत सापडला आहे.

### प्रत्यक्षात रस्त्यांची अवस्था जैसे थेच...

## खेडमध्ये खड्डे भरण्याचे फसवे रेकॉर्ड?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दरवर्षी उन्हाळ्यात रस्त्यांवरील खड्डे भरण्याची मोहीम राबवली जाते. यासाठी ठेकेदारांकडून लाखो रुपयांची कामे केली जातात. विभागाकडून देखभाल-दुरुस्तीचे दावे केले जातात. मात्र प्रत्यक्षात रस्त्यांची अवस्था जैसे थेच असल्याचे चित्र खेड तालुक्यात पाहायला मिळत आहे.

खेड तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील प्रमुख जिल्हा मार्गांवर खड्डे न भरताच दुरुस्तीची कामे पूर्ण झाल्याचे कागदोपत्री दाखवण्यात आल्याचा आरोप होत आहे. मे महिन्यात काही रस्त्यांचे व्हिडिओ चित्रीकरण करूनही अनेक ठिकाणी खड्डे कायम असल्याचे निदर्शनास आले आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर पुन्हा "पाऊस पडला आणि खड्डे पडले" असे सांगून नव्याने निधी मागण्याची तयारी सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.


छायाचित्र: निखिल पाचारणे

ठेकेदारांनी काम केल्याचे दाखवून निधी उचलला जातो, मात्र प्रत्यक्षात रस्त्यांवरील खड्डे कायम राहतात. पावसाळ्यात हेच खड्डे अधिक धोकादायक बनतात आणि वाहनचालकांच्या जीवाला धोका निर्माण होतो. दुचाकीस्वारांचे अपघात, महिलांना होणारा त्रास आणि वाहनांचे नुकसान यामुळे नागरिक संतप्त झाले आहेत. एका सामाजिक कार्यकर्त्याने सांगितले की, "निधी उपलब्ध असूनही जिल्हा परिषदेमार्फत पीडब्ल्यूडीच्या रस्त्यांवर काम करता येत नाही. ही मोठी अडचण आहे." मात्र ही अडचण नेमकी का निर्माण झाली आहे? सार्वजनिक बांधकाम विभाग, ठेकेदार आणि जिल्हा प्रशासन यांच्यात समन्वयाचा अभाव आहे की मुद्दाम दुर्लक्ष केले जात आहे? असा सवाल उपस्थित केला जात आहे. सध्याची परिस्थिती पाहता खेड तालुक्यातील प्रमुख जिल्हा मार्गांची अवस्था रस्त्यांपेक्षा खड्ड्यांच्या मार्गासारखी झाली आहे. पावसाळ्यात तक्रारी करूनही उपयोग होत नसल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत, कारण आधीच काम पूर्ण झाल्याचे खोटे रेकॉर्ड तयार करण्यात आल्याचा आरोप आहे. सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपल्या भागातील प्रमुख जिल्हा मार्गांची तातडीने पाहणी करावी. खड्डे प्रत्यक्षात भरले आहेत की केवळ कागदोपत्री कामे झाली आहेत, याची खात्री करून घ्यावी. बैठका आणि पत्रव्यवहारापेक्षा प्रत्यक्ष फोटो, व्हिडिओ आणि पुराव्यांसह तक्रारी करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. "सडलेल्या व्यवस्थेला जागेवर आणण्यासाठी काही ठिकाणी कठोर भूमिका घेण्याची वेळ आली आहे. प्रशासन जागे होणार की आणखी एक पावसाळा खड्ड्यांमध्ये बुडवणार?" असा सवाल उपस्थित केला जात आहे. खेड तालुक्याचे लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी आणि पीडब्ल्यूडीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दोषी अधिकारी आणि ठेकेदारांवर कारवाई करावी, अन्यथा ही फसवणूक सुरूच राहील, अशी मागणी होत आहे.

## सराईत चोरट्याला तीन वर्षांचा कारावास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** आळंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला राजगुरुनगर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस. व्ही. उतकर यांनी बुधवारी (दि. २०) तीन वर्षांचा साधा कारावास आणि २० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. हर्षद गुलाब पवार (वय ३१, रा. गुलाबनगर, घोटावडे फाटा, ता. मुळशी) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.

या खटल्यातील माहितीनुसार, चऱ्होली बुद्रुक गावच्या हद्दीत फिर्यादी कल्पना सुभाष पारख या २४ डिसेंबर २०२३ ते २७ डिसेंबर २०२३ या कालावधीत कुटुंबासह वडगाव शेरी येथे लग्नकार्यासाठी गेल्या होत्या. त्या परत आल्यानंतर त्यांच्या घराचे कुलूप तोडून घरातील कपाटातून सोने-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा सुमारे ९५ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केल्याचे उघड झाले.

या प्रकरणी कल्पना पारख यांनी आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार पोलिसांनी भारतीय दंड विधान कलम ४५४, ४५७ आणि ३८० अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक अजय लोहकरे आणि त्यांच्या पथकाने केला. तपासाअंती पोलिसांनी आरोपी हर्षद पवार याला १८ मार्च २०२५ रोजी अटक केली होती. या प्रकरणाची सुनावणी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस. व्ही. उतकर यांच्या न्यायालयात सुरू होती. न्यायालयाने निकाल देताना आरोपीला दोषी ठरवले. सरकारी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता ए. एस. चव्हाण यांनी चार साक्षीदार तपासले. आरोपी हर्षद पवार याचा इतर चार गुन्ह्यांमध्येही सहभाग असल्याचा युक्तिवाद करण्यात आला. न्यायालयीन पैरवी पोलीस हवालदार आर. एस. मोहिते आणि योगिता गावडे यांनी पाहिली.

## खेड तालुक्यात तीव्र पाणीटंचाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** खेड तालुक्यातील टंचाईग्रस्त भागांमध्ये सध्या १३ गावे आणि वाड्यावस्त्यांना १० शासकीय टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. मात्र चार गावांचे प्रस्ताव अद्याप मंजुरीच्या प्रतीक्षेत असल्याने ७ हजारांहून अधिक नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. गटविकास अधिकारी विशाल शिंदे यांनी ही माहिती दिली.



तालुक्यात ८ एप्रिलपासून खासगी वाहतूक एजन्सीमार्फत शासकीय टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. पूर्व पट्ट्यातील गुळाणी, वाफगाव, वाकळवाडी, वरुडे, पुर, कनेरसर, कोहिंडे बुद्रुक आणि तळवडे या आठ गावांसह वाड्यावस्त्यांमधील १८ हजार २८१ लोकसंख्येला टप्प्याटप्प्याने पाणीपुरवठा केला जात आहे.

त्यानंतर २७ एप्रिलपासून टोकावडे, वाळद, वाडा, वाशेरे आणि गोसासी या पाच गावांतील ४ हजार ७५८ लोकसंख्येसाठीही टँकर सुरू करण्यात आले. सध्या एकूण १० टँकरच्या माध्यमातून १३ गावे आणि वाड्यावस्त्यांमधील सुमारे १३ हजार नागरिकांना गेल्या दीड महिन्यापासून पाणीपुरवठा केला जात आहे.

दरम्यान, चऱ्होली खुर्द आणि नायफड या दोन गावांचे प्रस्ताव एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात दाखल करण्यात आले होते. तर कायोळी तर्फे वाडा आणि गाडकवाडी येथील प्रस्ताव मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सादर करण्यात आले. मात्र २० ते २५ दिवस उलटूनही या गावांना टँकर मंजूर झालेले नाहीत.

यामुळे या चार गावांतील ७ हजार ३१७ नागरिकांना ऐन उन्हाळ्यात पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असल्याने स्थानिक ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.


महसूल विभागाने या प्रस्तावांना तातडीने मंजुरी द्यावी, अशी मागणी टंचाईग्रस्त भागातील नागरिकांकडून करण्यात येत आहे. टंचाईची समस्या आणखी गंभीर होऊ नये, यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मतही ग्रामस्थांनी व्यक्त केले आहे.

## पुरंदर विमानतळ भूसंपादनाला वेग

### १५ जूनपर्यंत ३८ टक्के जमीन अधिग्रहणाचे उद्दिष्ट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुरंदर तालुक्यात प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रियेला वेग आला असून जिल्हा प्रशासनाने प्रत्यक्ष काम सुरू केले आहे. विमानतळासाठी आवश्यक जमिनीपैकी सुमारे ३८ टक्के जमीन अधिग्रहित करण्याची प्रक्रिया सुरू असून, १५ जूनपर्यंत हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे. सध्या शेतकऱ्यांकडून संमतीपत्रे आणि आवश्यक कागदपत्रे संकलित करण्याचे काम सुरू आहे.



या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी पुरंदर तालुक्यातील सात गावांमधील एकूण १,२१६ हेक्टर म्हणजेच सुमारे ३,०४० एकर जमीन संपादित केली जाणार आहे. प्रशासनाच्या माहितीनुसार, आतापर्यंत सुमारे १,१५२ जागांसाठी प्रतिज्ञापत्रे प्राप्त झाली आहेत. शेतकऱ्यांना मोबदल्याची रक्कम थेट बँक खात्यात जमा होत असल्यामुळे भूसंपादन प्रक्रियेला गती मिळाली आहे. आतापर्यंत सुमारे १५० कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत. प्राथमिक अंदाजानुसार, प्रत्येक शेतकऱ्याला सरासरी १.६१ कोटी रुपयांपर्यंत मोबदला मिळू शकतो. जमिनीवरील घरे, फळबागा, बोअरवेल, पाइपलाईन आणि इतर सुविधांचा विचार करता काही ठिकाणी ही रक्कम २ कोटी रुपयांपर्यंत जाऊ शकते.

या प्रकल्पासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सुमारे ५०० कोटी रुपये उपलब्ध करून दिले असून, उर्वरित निधी लवकरच जिल्हा प्रशासनाकडे वर्ग केला जाणार आहे. संमतीपत्र देणाऱ्या शेतकऱ्यांना नोटिसा पाठवण्याची प्रक्रिया जवळपास पूर्ण झाली आहे.

विमानतळ प्रकल्पात पारगाव, वनपुरी, कुंभारवळण, उदाची वाडी, एखतपूर, मुंजवडी आणि खानवडी या गावांचा समावेश आहे. १० जूनपर्यंत संमती देणाऱ्या शेतकऱ्यांना विकसित भूखंडातील १० टक्के जमीन परतावा म्हणून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, प्रस्तावित विमानतळाशेजारी २४५ हेक्टर क्षेत्रावर अत्याधुनिक एरोसिटी उभारण्याचाही प्रस्ताव आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ६ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुणे विमानतळावरील ताण कमी होण्यासोबतच आयटी, पर्यटन आणि औद्योगिक क्षेत्राला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## व्हॉट्सअ‍ॅप हॅकिंगचे वाढते प्रकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांजणगाव गणपती :** शिरूर तालुक्यासह ग्रामीण भागात सायबर फसवणुकीचे प्रकार झपाट्याने वाढत असून मोबाईल आणि व्हॉट्सअ‍ॅप हॅकिंगच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बँक ऑफ इंडियाच्या नावाने बनावट संदेश पाठवत "केवायसी अपडेट करा, अन्यथा खाते बंद होईल" असे सांगून नागरिकांना एपीके फाईल डाउनलोड करण्यास भाग पाडले जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

ही एपीके फाईल मोबाईलमध्ये डाउनलोड किंवा ओपन करताच मोबाईलवरील नियंत्रण सायबर गुन्हेगारांकडे जात असून व्हॉट्सअ‍ॅपसह मोबाईलमधील महत्त्वाची माहिती धोक्यात येत आहे. टाकळी हाजी (ता. शिरूर) येथील एका शिक्षकाचा मोबाईल अशाच प्रकारे पूर्णपणे हॅक झाल्याची घटना नुकतीच घडली.

संबंधित शिक्षकाने केवायसी अपडेटच्या नावाखाली आलेली फाईल उघडल्यानंतर मोबाईल अचानक बंद पडू लागला. विविध ॲप्स आपोआप सुरू होऊ लागले तसेच व्हॉट्सअ‍ॅपवरील नियंत्रणही सुटल्याचे त्यांच्या लक्षात आले. परिस्थिती गंभीर झाल्याने अखेर त्यांना मोबाईल पूर्णपणे फॉरमॅट करावा लागला. त्यामुळे मोबाईलमधील महत्त्वाची कागदपत्रे, फोटो, ऑनलाइन डेटा आणि अन्य माहिती नष्ट झाली.

"बँकेच्या नावाने मेसेज आल्यामुळे तो खरा असल्याचे वाटले. केवायसी अपडेट न केल्यास खाते बंद होईल, असे त्यात नमूद होते. त्यामुळे मी एपीके फाईल उघडली. काही वेळातच मोबाईल हॅक झाल्याचे लक्षात आले," असे संबंधित शिक्षकाने सांगितले. गावातील आणखी एका नागरिकाच्या बँक खात्यातून पैसे काढण्याचाही प्रयत्न करण्यात आला. सायबर गुन्हेगारांनी मोबाईलवर कॉल करून ओटीपी विचारला; मात्र संबंधित नागरिकाने कोणतीही माहिती न दिल्याने मोठी आर्थिक फसवणूक टळली. ग्रामीण भागात डिजिटल व्यवहारांचे प्रमाण वाढत असताना सायबर गुन्हेगार नागरिकांच्या अज्ञानाचा फायदा घेत असल्याचे दिसून येत आहे. बँकांच्या नावाने बनावट लिंक, संशयास्पद ॲप्स आणि एपीके फाईल पाठवून मोबाईल हॅक करण्याचे प्रकार वाढले आहेत. अनेक नागरिक अशा लिंक किंवा फाईल्सची सत्यता तपासून पाहत नसल्याने फसवणुकीचे प्रमाण वाढत असल्याचे जाणकारांचे मत आहे.

याबाबत शिरूर आणि रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी सतर्कतेचा इशारा दिला आहे. "कोणतीही बँक व्हॉट्सअ‍ॅपवर एपीके फाईल पाठवून केवायसी अपडेट करण्यास सांगत नाही. अनोळखी लिंक, एपीके फाईल किंवा संशयास्पद मेसेज ओपन करू नयेत. कोणालाही ओटीपी, बँक डिटेल्स किंवा पासवर्ड शेअर करू नयेत," असे आवाहन पोलिसांनी केले आहे. फसवणुकीच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## जागतिक परिचारिका दिन उत्साहात १३ परिचारिकांचा विशेष सन्मान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** रुग्णसेवेलाच ईश्वरकार्य मानून अहोरात्र सेवा देणाऱ्या परिचारिकांच्या समर्पणाचा गौरव करण्यासाठी जुन्नर येथे जागतिक परिचारिका दिनानिमित्त विशेष गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. पंचायत समिती आरोग्य विभाग जुन्नर, डिसेंट फाउंडेशन (पुणे) आणि जुन्नर तालुका सर्व परिचारिका भगिनी यांच्या संयुक्त विद्यमाने बारव येथील महालक्ष्मी मंगल कार्यालयात हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात जुन्नर तालुक्यातील १३ प्राथमिक आरोग्य केंद्रांमधून उत्कृष्ट रुग्णसेवा करणाऱ्या प्रत्येकी एका परिचारिकेचा 'फ्लोरेन्स नाइटिंगेल स्मृती आदर्श परिचारिका पुरस्कार २०२६' देऊन सन्मान करण्यात आला. डिसेंट फाउंडेशनच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कोरोना काळापासून ते दैनंदिन आरोग्य सेवेत स्वतःच्या कुटुंबाची पर्वा न करता रुग्णांसाठी कार्य करणाऱ्या परिचारिकांच्या कार्याचा गौरव करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे हा या पुरस्कारामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. जुन्नर पंचायत समितीच्या माजी सभापती कमलताई शेळकंदे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विनी कुळमेथे, डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवाई, सचिव डॉ. एफ. बी. आतार तसेच सरपंच नीता ताजने यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि तालुक्यातील परिचारिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पुरस्कार वितरणासोबतच परिचारिकांना आनंदाचे क्षण अनुभवता यावेत यासाठी विविध मनोरंजक खेळ, फॅशन शो आणि लकी ड्रॉ यांसारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते.

## आरटीई प्रवेश प्रक्रियेच्या चौकशीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** खेड तालुक्यातील आरटीई प्रवेश प्रक्रियेमध्ये शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी मोठा भ्रष्टाचार केल्याचा आरोप करत या प्रकरणाची विभागीय आयुक्तांकडून चौकशी करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिंदे शिवसेनेच्या पंचायत समिती सदस्यांनी केली. गुरुवारी (दि. २१) पंचायत समितीच्या मासिक सभेपूर्वी सदस्यांनी पंचायत समितीच्या प्रवेशद्वाराबाहेर आंदोलन करत जोरदार घोषणाबाजी केली.

या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेसचे महेंद्र मेदनकर, शंकर कावडे, दिनेश हांडे, श्रद्धा मांडेकर, अश्विनी तरस, मनीषा हिले तसेच शिंदे शिवसेनेचे निखिल थोरवे सहभागी झाले होते. आंदोलनकर्त्यांनी गळ्यात भ्रष्टाचाराचे फलक लावून शिक्षण विभागाविरोधात निषेध व्यक्त केला.




शासनाच्या शैक्षणिक धोरणानुसार राज्यातील खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये आरटीई अंतर्गत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. या प्रक्रियेनुसार विद्यार्थ्यांना इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मोफत शिक्षण दिले जाते. खेड तालुक्यात विविध शाळांमध्ये एकूण ८६४ प्रवेश लॉटरी पद्धतीने निश्चित करण्यात आले. ही प्रक्रिया पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. मात्र, प्रवेश प्रक्रियेत अनेक विद्यार्थ्यांचे प्रवेश नियमात बसत नसल्याचे कारण देत फेटाळण्यात आले, तर लॉटरीमध्ये दूरच्या क्रमांकावरील विद्यार्थ्यांना संधी देण्यात आल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. शिवसेना (उबाठा) गटाचे जिल्हा परिषद गटनेते ॲड. विजयसिंह शिंदे पाटील यांनी जिल्हाभरातील आरटीई प्रवेश प्रक्रिया आर्थिक तडजोडीतून झाल्याचा थेट आरोप केला आहे.


दरम्यान, या कथित भ्रष्टाचाराची चर्चा संपूर्ण तालुक्यात सुरू असून संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

### हायवाने केले चार गाड्यांचे नुकसान

## मुरूम उत्खननाच्या तक्रारीच्या रागातून जीवघेणा हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** मुरूम उत्खननाची तक्रार केल्याच्या रागातून एका तरुणावर जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना खेड तालुक्यातील रेटवडी येथे घडली. आरोपींनी हायवा गाडी अंगावर घालून ठार मारण्याचा प्रयत्न केला, तसेच कोयता, विळा, दगड आणि लाकडी दांडक्यांनी मारहाण करून चार वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले. बुधवारी (दि. २०) रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.



या प्रकरणी प्रमोद रघुनाथ हिंगे (वय २८, रा. रेटवडी, ता. खेड) यांनी खेड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अशोक कान्दू रेटवडे, दर्शन मच्छिंद्र काळे, संकेत कांताराम दुबे, प्रणव नवनाथ पवळे (सर्व रा. रेटवडी), प्रविण प्रकाश रामाणे (रा. दावडी, ता. खेड) तसेच अन्य तीन अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, रेटवडी गावातील एका हॉटेलच्या शेड आणि पार्किंग परिसरात आरोपींनी अमोल काळे यांना शिवीगाळ करून दमदाटी केली. त्यानंतर लाकडी दांडक्यांनी मारहाण करण्यात आली. पुढे आरोपींनी टाटा इंडिका वाहनातून कोयता आणि विळा काढून अमोल काळे यांच्या डोक्यावर, पाठीवर आणि पायावर वार केले. गंभीर जखमी झाल्यानंतर ते जमिनीवर पडले असताना आरोपींनी त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली.

यावेळी आरोपींनी हायवा गाडी अंगावर घालण्याचाही प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या चार वाहनांवर हायवाने धडक देत मोठे नुकसान केले. यामध्ये प्रमोद हिंगे यांची स्विफ्ट (एमएच-१४-केजे-३६८६), वैभव वाबळे यांची टाटा हेरियर (एमएच-१४-एमक्यू-८२८३), अमोल काळे यांची वेरणा (एमएच-१४-केपी-७५७७) आणि किरण पवार यांची आय-ट्वेन्टी (एमएच-१४-३६८३) या वाहनांचा समावेश आहे. आरोपींनी दगडफेक करूनही वाहनांचे नुकसान केले.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १०९(१), १८९(२)(४), १९१(२)(३), ३५२ आणि ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत गोडगे यांनी फिर्याद नोंदवली असून आरोपींचा शोध सुरू आहे.

दरम्यान, सेझ परिसरातील खेड सिटी भागात कंपन्यांच्या ठेक्यांवरून सुरू असलेल्या वादातून ही गुंडगिरी झाल्याची चर्चा असून, दोन दिवसांपूर्वीही दोन गटांमध्ये हाणामारीची घटना घडली होती.

## मंचरमधील 'कॅफे ३६०'वर पोलिसांची कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** मंचर शहर परिसरातील 'कॅफे ३६०'वर मंचर पोलिसांनी कारवाई करत संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी सिद्धेश रामदास चव्हाण (वय २२, रा. अवसरी बु., ता. आंबेगाव, जि. पुणे) याच्याविरोधात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. याबाबत मंचर पोलीस ठाण्यात पोलीस शिपाई योगेश परशुराम रोडे (बकल नं. २९२१) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २० मे रोजी दुपारी सुमारे १.४५ वाजण्याच्या सुमारास मंचर गाव हद्दीतील 'कॅफे ३६०'मध्ये अवैधरित्या पार्टिशन करून पडदे लावण्यात आले होते. तसेच शाळा आणि महाविद्यालयातील मुला-मुलींना असभ्य व अश्लील वर्तन करण्यास मुभा देत कॅफेच्या बैठक व्यवस्थेमध्ये बदल करण्यात आल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणी मंचर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार जांभळे करत आहेत. कारवाईची नोंद पोलीस हवालदार हगवणे यांनी केली.

दरम्यान, या कारवाईमुळे मंचर परिसरातील कॅफे व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली असून सार्वजनिक ठिकाणी नियमांचे काटेकोर पालन करण्याचा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे.

## सारांश वृत्त

### फरार आरोपीला दिल्लीत अटक

**नवी दिल्ली:** बलात्कार आणि पॉक्सो कायद्याच्या एका प्रकरणात फरार घोषित करण्यात आलेल्या ३८ वर्षीय व्यक्तीला दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने शुक्रवारी दिली. दक्षिण-पश्चिम दिल्लीतील जाफरपूर कलान येथील रहिवासी असलेला रिंकू उर्फ मोनू नावाचा आरोपी, २०२४ पासून न्यायालयीन कामकाजापासून कथितरित्या पळ काढत होता. काझीपूर गावाजवळ त्याच्या हालचालींची माहिती मिळाल्यानंतर त्याला अटक करण्यात आली, असे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

### राजस्थानात तीव्र उष्णतेची लाट

**जयपूर** : गेल्या २४ तासांत राजस्थानमध्ये हवामान बहुतांशी कोरडे राहिले असून, काही ठिकाणी उष्णतेची लाट आणि रात्री उबदार वातावरणाची नोंद झाली आहे, अशी माहिती हवामान विभागाने शुक्रवारी दिली. शुक्रवारी सकाळी संपलेल्या २४ तासांच्या कालावधीत श्री गंगानगरमध्ये राज्यातील सर्वाधिक कमाल तापमान ४५.१ अंश सेल्सिअसची नोंद झाली, तर सिरोहीमध्ये सर्वात कमी किमान तापमान २० अंश सेल्सिअस नोंदवले गेले. पुढील आठवड्यात राज्याच्या बहुतांश भागांमध्ये हवामान मुख्यतः कोरडे राहण्याची शक्यता आहे.



### सुरतमधील निवासी इमारतीला आग

**सुरत** : गुजरातच्या सुरत शहरातील एका १३ मजली इमारतीमधील फ्लॅटला शुक्रवारी सकाळी आग लागली आणि या निवासी संकुलातून ११ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या घटनेत कोणीही जखमी झाले नाही, असे त्यांनी सांगितले. "सुरतच्या वेसू भागातील 'जैनम द ग्रँड अल्टिमा' या उंच इमारतीच्या १३ मजली सी-टॉवरच्या नवव्या मजल्यावर सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास आग लागली," अशी माहिती अग्निशमन अधिकारी रोहित खलाशी यांनी दिली.

---

### अनेक राज्यांसाठी 'रेड अलर्ट', आरोग्य आणि शेतीसाठी इशारा

# देशभरात उष्णतेची तीव्र लाट कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** देशभरात उष्णतेची तीव्र लाट कायम असून भारतीय हवामान विभागाने वायव्य, मध्य आणि पूर्व भारतातील अनेक भागांसाठी 'रेड अलर्ट' जारी केला आहे. सलग वाढत्या तापमानामुळे उष्णतेशी संबंधित आजारांचा धोका वाढल्याचा इशारा हवामान विभागाने दिला असून नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

उत्तर प्रदेशातील बांदा हे शहर सध्या देशातील सर्वाधिक उष्ण ठिकाण ठरले असून तेथील तापमान सलग दोन दिवस ४८.२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. दरम्यान, दिल्लीमध्ये गुरुवारी ३१.९ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली असून, गेल्या १४ वर्षांतील ही सर्वात उष्ण रात्र ठरली आहे.

ओडिशा, विदर्भ, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, बिहार, पूर्व राजस्थान आणि उत्तर प्रदेशातील अनेक भागांमध्ये रात्रीचे तापमान सामान्यपेक्षा ३.१ ते ५ अंश सेल्सिअसने अधिक नोंदवण्यात आले आहे. देशातील वायव्य, मध्य आणि पूर्व भागातील इतर अनेक प्रदेशांमध्येही तापमान सरासरीपेक्षा १.६ ते ३ अंश सेल्सिअसने जास्त आहे.

सध्या अनेक राज्यांमध्ये कमाल तापमान ४० ते ४७ अंश सेल्सिअस दरम्यान आहे. उत्तराखंड, हरियाणा, पंजाब, चंदीगड, दिल्ली, मध्य प्रदेश आणि किनारपट्टीवरील आंध्र प्रदेशातील काही भागांमध्ये तापमान सामान्यपेक्षा तब्बल ५ अंशांनी अधिक नोंदवले गेले आहे.

हवामान विभागाने विशेषतः वृद्ध, लहान मुले आणि आधीपासून आरोग्य समस्या असलेल्या नागरिकांनी अधिक सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे. उष्माघात, डिहायड्रेशन आणि इतर उष्णताजन्य आजार टाळण्यासाठी पुरेसे पाणी पिणे, दुपारच्या उन्हात बाहेर पडणे टाळणे आणि हलके कपडे वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, आयएमडीने कृषी हवामान सल्लाही जारी केला असून उष्णतेच्या लाटेमुळे भाजीपाला आणि पिकांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. टोमॅटो, वांगी, मूग, कांद्याची रोपे, कापूस आणि उन्हाळी चारा पिकांना हलके आणि वारंवार पाणी देण्याची शिफारस करण्यात आली आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २६ मेपर्यंत वायव्य, मध्य आणि पूर्व भारतातील तापमानात कोणताही मोठा बदल होण्याची शक्यता नाही. त्यामुळे पुढील काही दिवस उष्णतेची तीव्रता कायम राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

याचदरम्यान, नैऋत्य मोसमी वाऱ्यांच्या पुढील प्रगतीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होत असल्याची माहिती आयएमडीने दिली आहे. पुढील तीन ते चार दिवसांत आग्नेय अरबी समुद्र, कोमोरिन परिसर, बंगालच्या उपसागरातील काही भाग आणि अंदमान समुद्राच्या उर्वरित भागात मान्सून पुढे सरकण्याची शक्यता आहे.

---

## उमर खालिद याला तीन दिवसांचा जामीन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालय यांनी फेब्रुवारी २०२० मधील ईशान्य दिल्ली दंगलींशी संबंधित यूएपीए प्रकरणात कार्यकर्ते उमर खालिद यांना तीन दिवसांचा अंतरिम जामीन मंजूर केला आहे. त्यांच्या आईच्या शस्त्रक्रियेपूर्वी त्यांना भेटता यावे, यासाठी न्यायालयाने हा दिलासा दिला. न्यायमूर्ती प्रतिभा एम. सिंग आणि मधू जैन यांच्या खंडपीठाने "सहानुभूतीपूर्ण दृष्टिकोन" ठेवत खालिद यांना १ जून ते ३ जूनदरम्यान तात्पुरती सुटका देण्याचा आदेश दिला.

न्यायालयाने नमूद केले की, सर्वोच्च न्यायालय यांनी ५ जानेवारी रोजी उमर खालिद यांचा नियमित जामीन अर्ज फेटाळला होता. मात्र, त्यांच्या आईसोबत काही वेळ घालवण्याची संधी मिळावी, या मानवी दृष्टिकोनातून अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला. दिल्ली पोलिसांच्या वतीने बाजू मांडताना अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू यांनी न्यायालयात युक्तिवाद केला की, खालिद यांच्या आईची शस्त्रक्रिया किरकोळ स्वरूपाची आहे. त्यामुळे त्यांना पोलीस बंदोबस्तात आईला भेटण्याची परवानगी देणे पुरेसे ठरले असते.

उच्च न्यायालय हे १९ मे रोजी सत्र न्यायालयाने दिलेल्या आदेशाविरोधातील अपिलावर सुनावणी करत होते. सत्र न्यायालयाने उमर खालिद यांचा अंतरिम जामीन अर्ज फेटाळला होता. खालिद यांनी त्यांच्या काकांच्या निधनानंतरच्या ४०व्या दिवसाच्या विधीस उपस्थित राहण्यासाठी आणि आईच्या उपचारादरम्यान तिची काळजी घेण्यासाठी १५ दिवसांच्या अंतरिम जामिनाची मागणी केली होती. कनिष्ठ न्यायालयाने कुटुंबातील इतर सदस्य आईची काळजी घेऊ शकतात, असे सांगत त्यांची मागणी नाकारली होती.

फेब्रुवारी २०२० मध्ये नागरिकत्व सुधारणा कायदा आणि राष्ट्रीय नागरिक नोंदणी विरोधातील आंदोलनादरम्यान ईशान्य दिल्लीमध्ये भीषण दंगली उसळल्या होत्या.

---

## राज्यसभेच्या २४ जागांसाठी १८ जूनला निवडणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** निवडणूक आयोग ने शुक्रवारी १० राज्यांमधील २४ राज्यसभा जागांसाठी निवडणुका जाहीर केल्या असून, १८ जून रोजी मतदान होणार आहे. २१ जून ते १९ जुलै दरम्यान विद्यमान सदस्य सेवानिवृत्त होणार असल्याने या जागा रिक्त होत असल्याचे आयोगाने निवेदनात म्हटले आहे.

निवडणुका होणाऱ्या राज्यांमध्ये आंध्र प्रदेश, गुजरात आणि कर्नाटक या राज्यांत प्रत्येकी चार सदस्यांची निवड होणार आहे. तर मध्य प्रदेश आणि राजस्थान मध्ये प्रत्येकी तीन जागांसाठी मतदान होईल. झारखंड मधून दोन जागांसाठी निवडणूक होणार असून मणिपूर, मेघालय, अरुणाचल प्रदेश आणि मिझोराम मधून प्रत्येकी एका सदस्याची निवड केली जाणार आहे. राज्यसभेतून निवृत्त होणाऱ्यांमध्ये मल्लिकार्जुन खर्गे, डी. व्ही. सदानंद गौडा, केंद्रीय मंत्री रवनीत सिंह बिट्टू, जॉर्ज कुरियन, माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह आणि काँग्रेस नेते शक्तीसिंह गोहिल यांचा समावेश आहे. निवडणूक आयोगाने महाराष्ट्र आणि तामिळनाडू येथील विधान परिषदेच्या प्रत्येकी एका जागेसाठी पोटनिवडणुकाही जाहीर केल्या आहेत.

महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विधानसभेवर निवड झाल्यानंतर सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने ही जागा रिक्त झाली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ८ जून असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

---

## जागतिक ऊर्जा बाजार 'रेड झोन'मध्ये

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लंडन :** पश्चिम आशियातील युद्धस्थितीत लवकर सुधारणा झाली नाही, तर आगामी जुलै-ऑगस्टपर्यंत जागतिक तेल बाजार गंभीर संकटाच्या उंबरठ्यावर पोहोचू शकतो, असा इशारा आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थाचे प्रमुख फातिह बिरोल यांनी दिला आहे.

लंडनमधील चॅथम हाऊस येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना बिरोल म्हणाले, "जर युद्धाच्या परिस्थितीत कोणतीही सकारात्मक सुधारणा झाली नाही, तर जुलै किंवा ऑगस्टमध्ये तेल पुरवठ्याच्या दृष्टीने जग धोक्याच्या क्षेत्रात प्रवेश




करू शकते."

फेब्रुवारीच्या अखेरीस अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्यांनंतर इराणने होर्मुझ सामुद्रधुनीतील टँकर वाहतुकीवर प्रभावी निर्बंध आणल्याने जागतिक ऊर्जा पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. होर्मुझ सामुद्रधुनी ही जगातील तेल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या मार्गावरील अडथळ्यांमुळे तेल आणि वायू वाहतुकीवर मोठा परिणाम झाला असून आंतरराष्ट्रीय बाजारात किमती झपाट्याने वाढल्या आहेत.

बिरोल यांनी सांगितले की, युद्ध सुरू होण्यापूर्वी बाजारात तेलाचा अतिरिक्त साठा उपलब्ध असल्याने सुरुवातीचा धक्का काही प्रमाणात नियंत्रित राहिला. मात्र, "तेल साठे वेगाने कमी होत आहेत," अशी गंभीर चिंता त्यांनी व्यक्त केली. युद्धामुळे बाधित झालेली उत्पादन आणि शुद्धीकरण क्षमता पूर्वपदावर येण्यासाठी बराच कालावधी लागू शकतो. त्यामुळे ऊर्जा बाजारातील अस्थिरता दीर्घकाळ टिकण्याची शक्यता आहे.

दरम्यान, जगभरातील सरकारांनी आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी सामरिक तेलसाठे खुले केले आहेत. आयईएने आपल्या ३२ सदस्य देशांच्या माध्यमातून एकूण ४२६ दशलक्ष बॅरल तेल बाजारात सोडण्याचे समन्वय केले असून, त्यापैकी सुमारे १६४ दशलक्ष बॅरल तेल आधीच वापरात आणण्यात आले असल्याची माहिती संस्थेने दिली आहे. ८ एप्रिल रोजी युद्धविराम जाहीर झाल्यानंतर प्रत्यक्ष लढाई थांबली असली तरी, कायमस्वरूपी शांतता करारासाठी सुरू असलेल्या वाटाघाटींना अद्याप यश आलेले नाही. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर अनिश्चिततेचे सावट कायम आहे.

---

## पठाणकोट-जम्मू महामार्गावर सीसीटीव्हीद्वारे हेरगिरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चंदीगड :** पंजाब पोलीस यांनी पठाणकोट येथील एका रहिवाशाला पाकिस्तानस्थित सूत्रधारांसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक केली आहे. आरोपीने पठाणकोट-जम्मू महामार्ग कॉरिडॉरमधील थेट सीसीटीव्ही फुटेज पाकिस्तानमधील हँडलर्सना पाठवल्याचा आरोप आहे.

राष्ट्रीय महामार्ग-४४ वरून जाणाऱ्या लष्करी ताफ्यांच्या आणि संवेदनशील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी या थेट पाळत ठेवणाऱ्या फीडचा वापर केला जात असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. प्राथमिक चौकशीत आरोपी बलजीत सिंग याने जानेवारी महिन्यात पठाणकोट-जम्मू महामार्गावरील पुलाजवळील एका दुकानात इंटरनेट-आधारित सीसीटीव्ही कॅमेरा बसवल्याची कबुली दिली. या कॅमेऱ्याच्या माध्यमातून लष्कर आणि निमलष्करी दलांच्या हालचालींवर पाळत ठेवून त्याचे थेट प्रक्षेपण पाकिस्तानस्थित सूत्रधारांना पाठवले जात असल्याचे तपासात समोर आले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीला दुबईस्थित एका अज्ञात व्यक्तीकडून सूचना मिळत होत्या आणि या कामासाठी त्याला ४० हजार रुपये देण्यात आले होते. गेल्या महिन्यातही पंजाब पोलीस यांनी आयएसआय-समर्थित दोन हेरगिरी गटांचा पर्दाफाश केला होता. हे गट चीनमध्ये बनवलेल्या सौरऊर्जेवर चालणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा वापर करून संवेदनशील लष्करी ठिकाणांचे थेट प्रक्षेपण पाकिस्तानस्थित सूत्रधारांना पाठवत असल्याचा आरोप आहे.

मे महिन्याच्या सुरुवातीला कपूरथला येथील मॉडेल टाऊन परिसरात बसवलेला सीसीटीव्ही कॅमेरा कथित आयएसआय-नियंत्रित गुप्तहेर जाळ्याचा भाग असल्याचे समोर आले होते.

---

### एनटीएच्या दाव्यावर काँग्रेसचा हल्लाबोल

## प्रत्यक्ष परीक्षेपूर्वीच पेपर फिरला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** नीट-यूजी २०२६ परीक्षेचा पेपर फुटला नसल्याचा दावा राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या अधिकाऱ्यांनी केल्यानंतर काँग्रेस ने केंद्र सरकारवर आणि एनटीएवर जोरदार टीका केली आहे. परीक्षेपूर्वीच प्रत्यक्ष प्रश्नांचा समावेश असलेला "अंदाजाचा पेपर" विद्यार्थ्यांमध्ये फिरत होता, असा गंभीर आरोप काँग्रेसने केला आहे.

जयराम रमेश यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर पोस्ट करत आरोप केला की, एनटीएच्या स्थापनेपासूनच मोदी सरकार आणि संबंधित यंत्रणा परीक्षा अनियमितता आणि पेपरफुटी प्रकरणे दडपण्यासाठी "पेपरफुटी माफिया"सोबत संगनमत करत आहेत. रमेश म्हणाले की, "प्रत्यक्ष परीक्षेत विचारले गेलेले अनेक प्रश्न असलेली प्रश्नपत्रिका आधीच विद्यार्थ्यांमध्ये फिरत होती, तर ती माहितीफुटी नव्हे तर काय?" त्यांनी एनटीएच्या महासंचालकांचे संसदीय समितीसमोरील वक्तव्य "अप्रामाणिक" असल्याचे म्हटले.



काँग्रेसने असा आरोपही केला की, २०२४ मधील नीट-यूजी प्रकरणातील कथित अनियमितता वेळेत मान्य करून कारवाई केली असती, तर २०२६ मधील परिस्थिती टाळता आली असती. राजस्थानातील सीकरसारखी केंद्रे पुन्हा चर्चेत असल्याचा दावाही करण्यात आला.

दरम्यान, सीबीआय ने २०२४ च्या यूजीसी-नेट परीक्षेबाबत कोणतीही अनियमितता आढळली नसल्याचा क्लोजर रिपोर्ट दाखल केल्याबद्दलही काँग्रेसने प्रश्न उपस्थित केले.

संबंधित न्यायालयाने या अहवालावर लेखी स्पष्टीकरण मागितल्याचेही रमेश यांनी नमूद केले. काँग्रेसने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना या प्रकरणासाठी जबाबदार धरले पाहिजे, अशी मागणी केली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, संसदेच्या शिक्षणविषयक स्थायी समितीसमोर एनटीएच्या अधिकाऱ्यांना अनेक खासदारांनी पेपरफुटी आणि परीक्षा सुरक्षेबाबत प्रश्न विचारले. यावेळी एनटीएच्या महासंचालकांनी सांगितले की, नीट-यूजी २०२६ चा पेपर "त्यांच्या प्रणालीमार्फत फुटलेला नाही" आणि या प्रकरणाची चौकशी सीबीआय करत आहे.

एनटीएने समितीला दिलेल्या माहितीनुसार, नीट-यूजी २०२६ परीक्षा ३ मे रोजी देश-विदेशातील ५६५ शहरांमधील ५,४३२ केंद्रांवर घेण्यात आली होती. १३ भाषांमध्ये झालेल्या या परीक्षेसाठी २२.७ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. पेपरफुटी आणि इतर अनियमिततांच्या आरोपांनंतर एनटीएने १२ मे रोजी नीट-यूजी २०२६ परीक्षा रद्द केली होती.

---

## बंगालच्या मुख्यमंत्र्यांना हुमायून कबीर यांची धमकी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** ईद-उल-अजहाच्या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगाल मध्ये पशूबळी आणि गोहत्या यावरून नवा राजकीय वाद निर्माण झाला आहे. हुमायून कबीर यांनी राज्य सरकारच्या निर्बंधांना उघडपणे विरोध करत "कुराणमध्ये बलिदानाचा आदेश आहे आणि धार्मिक प्रथांमध्ये हस्तक्षेप सहन केला जाणार नाही," असे विधान केले आहे.

आम जनता उन्नयन पार्टीचे प्रमुख आणि आमदार असलेल्या कबीर यांनी मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांनाही थेट इशारा दिला. "आम्ही कायद्याचा आदर करतो, पण बलिदान होणारच. कुराणमध्ये जे लिहिले आहे त्याचे पालन केले जाईल. आगीशी खेळू नका, हे धोकादायक ठरू शकते," असे ते म्हणाले.

कबीर यांनी १९५० च्या पशुहत्या नियंत्रण कायद्यांतर्गत लागू करण्यात आलेल्या निर्बंधांवर टीका करत, "सरकार नियम लागू करू शकते, पण धार्मिक परंपरा थांबवू शकत नाही," असे म्हटले. त्यांनी गायी, बकऱ्या आणि उंटांच्या बळीची परंपरा सुरूच राहील, असेही स्पष्ट केले. रस्त्यावर नमाज अदा करण्यावरील निर्बंधांवर नाराजी व्यक्त करत त्यांनी ईदसाठी पुरेशी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. "व्यवस्था नसेल तर रस्त्यावर नमाजालाही परवानगी देऊ नये," असे कबीर म्हणाले.

कलकत्ता उच्च न्यायालय यांनी फिटनेस प्रमाणपत्राशिवाय गाय किंवा म्हशींच्या कत्तलीवर बंदी घालणाऱ्या राज्य सरकारच्या आदेशाला स्थगिती देण्यास नकार दिला आहे.

न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या आधीच्या निरीक्षणांचा हवाला देत, "गायीचा बळी हा ईद-उल-अजहाचा अनिवार्य धार्मिक भाग नाही," असे स्पष्ट केले.

राज्य सरकारने १३ मे रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार सार्वजनिक ठिकाणी पशुहत्या करण्यास बंदी घालण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास सहा महिन्यांपर्यंत कारावास, एक हजार रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. या वादावर प्रतिक्रिया देताना सामिक भट्टाचार्य यांनी हा मुद्दा कायद्याची अंमलबजावणी आणि अवैध कत्तलखाने रोखण्याशी संबंधित असल्याचे म्हटले.

---

### भारत आणि सायप्रस यांच्यात भागीदारी

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सायप्रसचे अध्यक्ष निकोस ख्रिस्तोदौलिदेस यांचे व्यापक चर्चेसाठी यजमानपद भूषवले असता, भारत आणि सायप्रसने शुक्रवारी आपले संबंध सामरिक भागीदारीच्या पातळीवर नेले आणि पायाभूत सुविधा व जहाजबांधणी यांसारख्या क्षेत्रांमध्ये अधिक सखोल सहकार्याला चालना देण्यासाठी एक संयुक्त कार्यदल स्थापन केले. दोन्ही नेत्यांनी पश्चिम आशिया संकट तसेच यावेळी युक्रेन संघर्षावरही चर्चा केली.

---

## सीबीएसईच्या त्रिभाषा धोरणाविरोधात सुनावणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) च्या १ जुलैपासून इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी तीन भाषांचा अभ्यास अनिवार्य करणाऱ्या धोरणाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर पुढील आठवड्यात सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी सहमती दर्शवली.

ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची व विपुल एम. पंचोली यांच्या खंडपीठासमोर हे प्रकरण सादर केले आणि याला तातडीची जनहित याचिका म्हटले. "ही एक तातडीची जनहित याचिका आहे. याचिकाकर्त्यांमध्ये विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचा समावेश आहे. ते सीबीएसईच्या नवीन धोरणाला आव्हान देत आहेत, ज्यानुसार नववी इयत्तेत आणखी दोन भाषा अनिवार्य करण्यात आल्या आहेत," असे मुकुल रोहतगी यांनी सांगितले. लवकर सुनावणी व्हावी अशी मागणी करत त्यांनी सर्वोच्च न्यायालयाला सोमवारी हे प्रकरण हाती घेण्याचे आवाहन केले आणि "यामुळे गोंधळ निर्माण होईल," असे नमूद केले. मात्र, सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी सांगितले की, न्यायालयाचा पुढील आठवडा संक्षिप्त कामकाजाचा असल्याने हे प्रकरण पुढील आठवड्यात सुनावणीसाठी ठेवले जाईल.

---

### डीआरडीओचे सामरिक यश

# चीनच्या पीएल-१५ई क्षेपणास्त्राची गुपिते उलगडली

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (डीआरडीओ) आणि भारतीय हवाई दल (आयएएफ) यांनी मोठे सामरिक यश मिळवत पाकिस्तानकडून वापरण्यात आलेल्या चीननिर्मित पीएल-१५ई हवेतून हवेत मारा करणाऱ्या अत्याधुनिक क्षेपणास्त्राची महत्त्वपूर्ण इलेक्ट्रॉनिक गुपिते उलगडली आहेत. पंजाबमध्ये सापडलेल्या या क्षेपणास्त्राचा सखोल अभ्यास केल्यानंतर भारतीय तज्ज्ञांनी त्याच्या रडार, संवाद प्रणाली आणि अँटी-जॅमिंग तंत्रज्ञानाची माहिती मिळवली असून, भविष्यात भारतीय हवाई दलाला हे क्षेपणास्त्र हवेतच निष्प्रभ करण्यास मदत होणार असल्याचे मानले जात आहे.

मे २०२५ मध्ये 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान भारत-पाकिस्तान तणाव वाढला असताना पाकिस्तानी हवाई दलाने आपल्या चेंगडू जे-१०सी आणि जेएफ-१७ थंडर लढाऊ विमानांमधून पीएल-१५ई क्षेपणास्त्रे डागली होती. मात्र, काही क्षेपणास्त्रे लक्ष्य भेदण्यात अपयशी ठरली आणि त्यांची आत्म-विनाशक यंत्रणाही सक्रिय झाली नाही. इंधन संपल्यानंतर ती जमिनीवर कोसळली. पंजाबमधील होशियारपूर जिल्ह्यातील कामाही देवी गावाजवळ असेच एक क्षेपणास्त्र सुरक्षित अवस्थेत सापडले. भारतीय हद्दीत सुमारे १०० किलोमीटर आत सापडलेल्या या क्षेपणास्त्रामुळे भारतीय गुप्तचर संस्था आणि संरक्षण संशोधकांना त्याचा बारकाईने अभ्यास करण्याची मोठी संधी मिळाली.

फ्रेंच संरक्षणविषयक संस्था मेटा-डिफेन्स च्या वृत्तानुसार, गेल्या वर्षभरात भारतीय शास्त्रज्ञांनी या क्षेपणास्त्राची इलेक्ट्रॉनिक संरचना पूर्णपणे उलगडली आहे. त्यामध्ये कार्यपद्धती, रडार उत्सर्जन, संवाद प्रणाली, फ्रिक्वेन्सी-अजिलिटी यंत्रणा तसेच अँटी-जॅमिंग तंत्रज्ञानाचा समावेश आहे. हे क्षेपणास्त्र लक्ष्यांचा मागोवा कसा घेते आणि इलेक्ट्रॉनिक जॅमिंगला कसे चकवते, याचीही माहिती भारतीय यंत्रणांना मिळाली आहे.

या क्षेपणास्त्राशी संबंधित सर्व महत्त्वपूर्ण तांत्रिक माहिती आता भारतीय हवाई दलाच्या इलेक्ट्रॉनिक युद्ध डेटाबेसमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे युद्धस्थितीत भारतीय संरक्षण प्रणाली हे क्षेपणास्त्र ओळखून त्याचा प्रभाव कमी करू शकतील. याचा थेट फायदा राफेल, सुखोई आणि एचएएल तेजस या भारतीय लढाऊ विमानांच्या इलेक्ट्रॉनिक युद्ध प्रणालींना होणार आहे.

हे चीनने विकसित केलेले अत्याधुनिक लाँग-रेंज एअर-टू-एअर क्षेपणास्त्र असून ते पाकिस्तानच्या हवाई शस्त्रसाठ्यातील महत्त्वाचा भाग मानले जाते. या क्षेपणास्त्राचा पल्ला सुमारे १४५ किलोमीटर असल्याचे सांगितले जाते. ड्युअल-पल्स सॉलिड रॉकेट मोटर आणि एईएसए रडार सीकरने सज्ज असलेले हे क्षेपणास्त्र मॅक ५ वेगाने लक्ष्य भेदू शकते.

दरम्यान, या घटनेमुळे चीनच्या संरक्षण क्षेत्रातही खळबळ उडाल्याचे वृत्त आहे. गुप्तचर माहितीनुसार, चायना एअरबोर्न मिसाईल अकॅडमीचे तांत्रिक पथक पाकिस्तानमध्ये दाखल झाले आहे. या क्षेपणास्त्राची गोपनीय माहिती भारताच्या हाती लागल्यामुळे चीन-पाकिस्तानच्या हवाई क्षमतेविरोधात भारताला मोठा रणनीतिक फायदा मिळू शकतो.